आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता

२४ डिसेंबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- 'एक देश एक निवडणूक' साठी संयुक्त संसदीय समितीची पहिली बैठक ८ जानेवारी रोजी होणार
- ई- कॉमर्समधले संशयित गैरव्यवहार हुडकून काढण्यासाठीच्या विविध उपाययोजनांचं केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
- भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवलेल्या अंदाजांच्या अचूकतेत गेल्या दहा वर्षांत ४० ते ५० टक्क्याची वाढ

**आणि**

- प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक शाम बेनेगल यांच्या निधनाबद्दल मान्यवरांनी व्यक्त केला शोक/ आज दुपारी मुंबईत होणार अंत्यसंस्कार

**<><><><><>**

'एक देश एक निवडणूक' साठी संयुक्त संसदीय समितीची पहिली बैठक येत्या ८ जानेवारी रोजी होणार आहे. भाजपाचे ज्येष्ठ खासदार पी पी चौधरी यांच्या अध्यधतेखाली होणारी ही बैठक प्रास्ताविक स्वरुपाची असणार आहे. कायदा आणि न्याय मंत्रालयाचे प्रतिनीधी समितीच्या ३९ सदस्यांना या दोन्ही विधेयकांबद्दल माहिती देतील. संविधान सुधारणा विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक गेल्या मंगळवारी लोकसभेत सादर करण्यात आलं आणि गेल्या शुक्रवारी संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन व्यासपीठांवरचा धोका ओळखण्यासाठी आणि ग्राहकांना सक्षम करण्यासाठी केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज तीन नव्या ॲपचं उद्घाटन केलं. यात जागो ग्राहक जागो ॲप, जागृती ॲप, आणि जागृती डॅशबोर्डचा समावेश आहे. या ॲपमुळे फसवणुकीच्या प्रकरणाविरोधात कारवाई करणं केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधीकरणाला शक्य होणार आहे. जागो ग्राहक ॲपमुळे ग्राहकांना URL ची माहिती मिळणं शक्य होणार आहे. तसंच यातून काही धोका असल्यास ग्राहकाला सावधानतेचा इशारा दिला जाणार आहे.  जागृती ॲपमुळे ग्राहकांना URL ची तक्रार करता येणार आहे.

सरकार ग्राहकांच्या हक्कांचं संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहे असं प्रल्हाद जोशी यांनी यावेळी सांगितंल. सुरक्षित, पारदर्शक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि ऑनलाईन व्यासपीठांवरील फसवणूक रोखण्यासाठी  सरकार वचनबद्ध असल्याचंही जोशी  म्हणाले.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांमध्ये १ लाख कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या स्मार्टफोनची निर्यात केली असल्याचं इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाज माध्यमावर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे. उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेमुळे देशातल्या स्मार्टफोनची निर्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत ४५ टक्क्यांनी वाढल्याची माहिती त्यांनी दिली. चालू आर्थिक वर्षात स्मार्टफोनची निर्यात १ लाख ७०

हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेश या राज्यांमधल्या ग्रामीण भागासाठी केंद्र सरकारने दोन हजार कोटी रुपयांहून अधिक अनुदान जारी केल्याची माहिती पंचायती राज मंत्रालयाने दिली आहे. उत्तर प्रदेशासाठी १ हजार ५९८ कोटींहून अधिक तर आंध्र प्रदेशासाठी ४४६ कोटी रुपयांहून अधिक निधी जारी करण्यात आला आहे. या अनुदानाचा वापर पंचायती राज संस्था आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारे केला जाईल. ग्रामीण भागातल्या स्थानिक प्रशासनात बदल घडवण्यासाठी सरकार अशा प्रकारे थेट अनुदान देत असल्याची माहितीही मंत्रालयाने दिली आहे.

<><><><><>

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयातून निवृत्त झालेले न्यायमूर्ती व्ही. रामसुब्रमण्यम यांची नियुक्ती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केली आहे. प्रियांक कानुंगो आणि निवृत्त न्यायमूर्ती डॉ. विद्युत रंजन सारंगी यांचीही सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

<><><><><>

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम ही मोहिम या महिन्यात सुरु झाली. या मोहिमेंतर्गत नि:क्षय ही रुग्ण व्यवस्थापन प्रणाली राबवण्यात येत आहे. शंभर दिवसात क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाने पंजाब राज्यात वेग घेतला आहे. या

अंतर्गत क्षयाच्या प्रादुर्भावाची शक्यता असणाऱ्या अठरा जिल्ह्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आलं आहे. या अंतर्गत बत्तीसशे चमूंनी आतापर्यंत वृद्ध, आजारी, धूम्रपान करणारे म्हणजेच या आजाराला बळी पडू शकतील अशा एक लाख सहा हजार व्यक्तींची तपासणी केली आहे. यासाठी १ हजार ३०० निःक्षय शिबिरं आणि १४ निःक्षय वाहनं तैनात केली आहेत.

<><><><><>

भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवलेल्या अंदाजांच्या अचूकतेत गेल्या दहा वर्षांत ४० ते ५० टक्क्याची वाढ झाली असं विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितलं आहे.भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या स्थापनेला येत्या १५ जानेवारीला दीडशे वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त ते बोलत होते. अतिवृष्टीच्या अंदाजाची अचूकता देखील ६० टक्क्याहून ८० टक्क्यापर्यंत वाढली असल्याचं त्यांनी सांगितलं. या विभागामार्फत सध्या साडेपाचशे विभागीय वेधशाळा, दोन हजार स्वयंचलित हवामान केंद्र आणि ३९ ठिकाणी डॉप्लर रडार प्रणाली कार्यरत आहेत, असंही ते यावेळी म्हणाले. पुढच्या दोन वर्षांत आणखी ३४ रडार बसवले जातील ज्यामुळे पुढच्या पाच वर्षांत याच अंदाजांच्या अचूकतेत आणखी १० ते १५ टक्के वाढ होईल, असा विश्वासही महापात्रा यांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात थंडीची तीव्र लाट आली असून हिमाचल प्रदेश, जम्मू- काश्मीर, लडाख, आणि उत्तराखंडमधे अनेक ठिकाणी हिमवृष्टी होत आहे. जम्मू काश्मीरमधे रस्त्यांवर बर्फ साचत असून ते साफ करण्याचं काम

प्रशासन करीत आहे. मात्र हिमवृष्टीचा अंदाज लक्षात घेऊन पर्यटकांनी सावधगिरी बाळगावी तसंच प्रशासन आणि वाहतूक विभागाने दिलेल्या सूचनांचं पालन करावं असं आवाहन करण्यात आलं आहे. लडाखमधे सेनादलांच्या फायर अँड फ्युरी कॉर्प्सद्वारे द्रास हिवाळी कार्निव्हल 2024-25 आयोजित करण्यात आलं आहे. त्यात रोमांचक आइस हॉकी लीग सामने आणि तिरंदाजी स्पर्धा होत आहे.

हिमाचल प्रदेशात अधूनमधून होणारी हिमवृष्टी आणि पावसामुळे तापमानात लक्षणीय घट झाली आहे. शेती, फळबागा आणि फूलशेतीसाठी हा ओलावा उपकारक असल्याने शेतकऱ्यांमधे आनंदाचं वातावरण आहे. उत्तराखंडमधेही उंचावरच्या क्षेत्रात हिमवृष्टी होत असून सखल भागात पावसाने हजेरी लावली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये २६ ते २८ डिसेंबरदरम्यान मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २६ डिसेंबर रोजी कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यांतल्या दक्षिणेकडच्या तुरळक भागांत, २७ डिसेंबर रोजी खानदेश, मध्य महाराष्ट्र, उत्तर मराठवाडा, आणि पश्चिम विदर्भातील विविध ठिकाणी, तर २८ डिसेंबर रोजी खानदेश, मराठवाड्यातले उत्तरेकडचे जिल्हे आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर या भागातल्या शेतकऱ्यांनी कृषिविषयक सल्ला आणि हवामानाच्या अंदाजाकडे लक्ष ठेवून त्यानुसार नियोजन करावं, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**<><><><><>**

ख्यातनाम चित्रपट दिग्दर्शक दिवंगत श्याम बेनेगल यांच्या पार्थिवावर आज मुंबईच्या शिवाजीपार्क स्मशान भूमीत अंत्यसंस्कार होतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शाम बेनेगल यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. बेनेगल त्यांच्या कामाला पुढील पिढ्यांचीही प्रशंसा मिळत राहील, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

बेनेगल यांच्या निधनामुळे चित्रपट निर्मात्यांना प्रेरणा देणारा एक प्रतिभावंत निर्माता - दिग्दर्शक आपण गमावला आहे अशा शब्दात महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी श्याम बेनेगल यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. भारतीय चित्रपट सृष्टीत वास्तववादी चित्रपट निर्मितीचे समांतर पर्व आणणारे श्याम बेनेगल अजरामर राहतील अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बेनेगल यांना श्रद्धांजली वाहिली आहे. सामाजिक भान राखून त्या धाटणीचे सर्वस्पर्शी चित्रपट बनवण्यात बेनेगल यांचा हातखंडा होता. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीच्या इतिहासातला सोनेरी अध्याय संपला आहे", अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्येष्ठ दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

चित्रपट सृष्टीतल्या इतर अनेक मान्यवरांनी बेनेगल यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

प्रसिद्ध दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी सांगितलं.....

**होल्ड - बाईट - जब्बार पटेल....**

**//<><><><><>//**